झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र.झोपुप्रा/सप्रा-१/झोपुआ/प्र.क्र.२४२/ १९३ /२०१८.
दिनांक :- ०८ /०१/२०१८.

## "झोपडपट्टी पुनर्वसन आदेश"

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे सोयीकरिता **'उपरोक्त अधिनियम'** असा करणेत येत आहे) चे कलम ३ अ (१) (२) अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र. झो.पु.यो-२००४/प्र.क्र.-२१३/ झो.प.सु-१ दि. ३०/६/२००५ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे आणि उक्त प्राधिकरणासाठी स्वतंत्र मुख्य कार्यकारी अधिकारी यांची नेमणूक केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, उपरोक्त उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी विकसक मे. मॉडर्न ग्रुप यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि.२०/०३/२०१७ रोजी प्रस्ताव दाखल केलेला आहे.

प्रस्तावाच्या अनुषंगाने उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.३, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनी न.भू.क्र.५३, ५५, ५५/१ व ५६, गणेश पेठ, पुणे या जागेवरील झोपडपट्टीचे सर्व्हेक्षण करुन उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार झोपडीधारकांची प्राथमिक पात्रता यादी दि.२९/०६/२०१७ रोजी निश्चित केलेली आहे. कार्यालयीन परिपत्रक क्र.२०९, दि.०३/०६/२०१७ अन्वये सदरचे कार्यक्षेत्र उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क.१, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांचे अखत्यारीत येत असलेने त्यांनी दि.३१/०७/२०१७ रोजी झोपडीधारकांची अंतिम पात्रता यादी निश्चित केली आहे. सदर दि.३१/०७/२०१७ रोजी सादर केलेल्या परिशिष्ट-२ मध्ये नमुद केल्याप्रमाणे उपरोक्त जमिनीवर एकूण ४१ झोपडीधारक असून त्यापैकी पात्र निवासी ३२, पात्र बिगरनिवासी ४ व संयुक्त ० असे एकुण ३६ झोपडीधारक पुनर्वसनास पात्र ठरले आहेत. पात्र झोपडीधारकांपैकी ३६ झोपडीधारकांनी (१००%) मे. मॉडर्न ग्रुप यांना पुनर्वसन योजनेसाठी संमती दिलेली आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी असलेने व ती घोषित नसलेमुळे उपआयुक्त तथा सक्षम प्राधिकारी विभागीय कार्यालय क्र.३, पुणे महानगरपालिका यांनी झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती असलेचा अहवाल कार्यालयीन पत्र जा.क्र.३/९२३. दि.१३/११/२०१४ अन्वये सादर केला आहे.

तसेच कार्यालयीन परिपत्रक क्र.१८० अन्वये झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती संबंधित ठिकाणी आहे किंवा नाही, हे निश्चित करण्यासाठी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा., पुणे यांनी सर्व्हेक्षक, उपअभियंता व उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी

क्र.१ व २ यांना प्राधिकृत केले होते व त्यानुसार सर्व्हेक्षक, उपअभियंता व उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.१ व २ यांनी उक्त ठिकाणची पाहणी करुन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा., पुणे यांना सादर केलेल्या अहवालाचे आधारे दि.१९/१२/२०१६ रोजीच्या दै. आज का आनंद मध्ये याबाबत जाहीर प्रकटनाद्वारे सदर क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणेबाबत हरकती /सुचना मागविणेत आल्या होत्या. त्यानंतर उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.१ यांनी कार्यालयीन परिपत्रक क्र.२१५. दि.०१/०७/२०१७ अन्वये उक्त जागेची पाहणी करुन दि.२५/०७/२०१७ च्या अहवालान्वये उक्त जागेवर झोपडपट्टी सदृश्य अहवाल असलेबाबत खातरजमा केली आहे. त्यामुळे सदरचे क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे. तसेच सदरील झोपडपट्टी क्षेत्र सदृश्य परिस्थितीने एखादी इमारतसुद्धा बाधित होत असल्यास झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रात येते, असे स्पष्टीकरण कायदा सल्लागार यांनी त्यांच्या दि.२१/१२/२०१७ रोजीच्या अहवालाद्वारे दिले आहे.

त्याअर्थी, मी पांडुरंग पोले, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे महाराष्ट्र झोपडपट्टी ( सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास ) अधिनियम १९७१ चे कलम ३ क (१) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये खालील अनुसूचित नमुद केलेले क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करीत आहे.

सदरच्या आदेशामुळे बाधित होणा-या कोणत्याही व्यक्तिस आदेश प्रसिध्द झाल्यापासून चार आठवडयांच्या आत महाराष्ट्र झोपडपट्टी ( सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास ) अधिनियम १९७१ च्या कलम ३ क (२) अन्वये विशेष न्यायाधिकरणाकडे अपील दाखल करता येईल आणि विशेष न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम राहील.

**अनुसूची**

| जमिनीचा तपशील | क्षेत्र ( चौ.मी.) | चतु:सिमा |
|---|---|---|
| न.भू.क्र.५३, ५५ व ५६, गणेश पेठ, पुणे. | ५८५.१८ चौ. मी. | **पुर्वेस -** लागू रस्ता. |
| | | **पश्चिमेस -** लागू बोळ |
| | | **उत्तरेस -** लागू रस्ता |
| | | **दक्षिणेस -** लागू रस्ता |

सदरचा आदेश हा माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देण्यात आला.

**(पांडुरंग पोले)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.

दिनांक -